RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ६५] शुक्रवार, डिसेंबर १४, २०१८/अग्रहायण २३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १०७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४.—** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. .. .. | पृष्ठे १-२ |

दिनांक १३ डिसेंबर २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्र"** दिनांक १४ डिसेंबर २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ८ जून २०१८ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१८ हा प्रख्यापित केला होता ; २०१८ चा महा. अध्या. १५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१८, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ८ जून २०१८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ह्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (२) मधील, पाचव्या परंतुकामध्ये, " भागभंडवलाच्या स्वरूपात शासनाचा हिस्सा असलेल्या संस्थेच्या बाबतीत " या मजकुराऐवजी, " भाग भांडवल, कर्ज, हमी, अनुदान, शासकीय जमीन या स्वरुपात किंवा इतर कोणत्याही स्वरूपात–मग ते रोख किंवा वस्तू रूपाने असो, शासनाचे सहाय्य असलेल्या गृह निर्माण संस्था वगळून इतर संस्थेच्या बाबतीत," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९६१ चा महा. २४.

सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१८ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

२०१८ चा महा. अध्या. १५.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असेल तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक ८५] शुक्रवार, डिसेंबर १४, २०१८/अग्रहायण २३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक १६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Co-oprative Socities (Amendment) Act, 2018 (Mah. Act No. LXIV of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. LXIV OF 2018.

( First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 14th December 2018. )

An Act further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

Mah. XXIV of 1961. Mah. Ord. XV of 2018.

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2018 on the 8th June 2018 ;

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Act, 2018.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 8th June 2018.

Amendment of section 73AAA of Mah. XXIV of 1961.

**2.** In section 73AAA of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, (hereinafter referred to as "principal Act") in sub-section *(2)*, in the fifth proviso, for the words " in respect of the society having contribution of the Government towards its share capital " the words " in respect of society, excluding the Housing Society, having assistance of the Government in the form of share capital, loan, guarantee, grant, the Government land or any other form whether cash or kind " shall be substituted. Mah. XXIV of 1961.

Repeal of Mah. Ord. XV of 2018 and saving.

**3.** *(1)* The Maharashtra Co-operative Societies (Amendment) Ordinance, 2018, is hereby repealed. Mah. Ord. XV of 2018.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provision of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.